भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ५७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०८/२०१७

**१) वाहनाची एसटी बसला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०८/२०१७ चे १७.१० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने , निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे बस क्र. एमएच ४०/ ८६२१ ला धडक मारून १०,०००/रु ची नुकसान केल्याने फिर्यादी मोहण पांडुरंगजी निखाडे वय ५३ वर्ष, रा. मालवीय नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) निष्काळजीपणे वाहन चालवुन इसमास धडक दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०८/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी मदन भिका गायधने वय ४५ वर्ष रा. पोहरा हा गावातील घुसाई बोडीत गायी चारीत असतांनी पोहरा ते मानेगाव रोडचे किनाऱ्यावर उभा असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन पोहरा करून मानेगावला जाण्यास निघाले असता त्या दरम्यान हयगयीने,निष्काळजीपने वाहन चालवुन आपले मोटार सायकलने जखमी फिर्यादी याचे डावे पायाला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) सर्पदंशाने महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक १४/०८/२०१७ चे २०.५५ वा. दर. यातील मृतक सौ. मनोरमा भैयाजी कटाणे वय ५२ वर्ष रा. घरतोडा ही दि. १४/०८/२०१७ ला सांयकाळी १९.०० वा. सुमारास आपले राहते घरी घरीच झाडे लावत असतांनी कोणत्यातरी विषारी सापाने उजव्या हाताचे अंगठया जवळील बोटाला चावा घेतल्याने तिला औषधोपचारा करीता पिएससी कोंढा कोसरा येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादीचे गोपाल श्रावण तलमले वय ४४ वर्ष रा. घरतोडा याचे तोंडी रिपोर्ट व पो.स्टे अडयाळ येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे प्राप्त जा.क्र. १३२५/१७ अन्वयचे कागदपत्रावरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) शेतात मृत अवस्थेत इसमाचे प्रेत मिळुन आले . :–**

दिनांक १६/०८/२०१७ चे १२.०० वा. पुर्वी दर. यातील मृतक शामलाल पुनाराम चौधरी वय ४८ वर्ष, रा. कंटगी मध्यप्रदेश याचे प्रेत मृत अवस्थेत हिरोतीराम गौपाले रा. आष्टी यांचे शेतात मिळुन आल्याने फिर्यादी निशांत भोजेन्द्र ठाकुर वय २७ वर्ष रा. वार्ड क्र. ७ शिवमंदीर रोड कंटगी याचे बयाना वरून पो.स्टे. गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पोलीस स्टेशन गोबरावाही हे करीत आहे.

**५) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०८/२०१७ चे १७.२० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन बस क्र. एमएच ४० /८६२१ रस्त्यामध्ये मधोमध लावुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.मेसरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १६/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ ,तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०० केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.